# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.09.2025** **वार- मंगळवार**

---

पुणे जिल्ह्यातील रांजणगाव ग्रामपंचायतीत वाढलेली लोकसंख्या आणि पायाभूत सुविधांवरील ताण यावर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिले आहेत. रांजणगावची मूळ लोकसंख्या फक्त ११ हजार आहे, पण एमआयडीसी उद्योग क्षेत्रामुळे इथे स्थलांतरित लोकसंख्या २ लाखांवर पोहोचली आहे. त्यामुळे पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते आणि इतर सुविधा जास्त मागणीनुसार काम करत नाहीत. याशिवाय कारेगाव, ढोकसांगवी आणि हिवरे ग्रामपंचायतींच्या समस्याही त्वरीत सोडवण्याचे आदेश पवार यांनी दिले आहेत.

पुणे जिल्ह्यातील तळेगाव–चाकण–शिक्रापूर राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्ती आणि रुंदीकरणासाठी ५९ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीला मान्यता मिळाली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली. या प्रकल्पात तळेगाव ते चाकण दरम्यान चार पदरी उन्नत मार्ग तर चाकण ते शिक्रापूर दरम्यान सहा पदरी रस्ता बांधण्यात येणार आहे.

**<u>बी.फार्म.केंद्रीय प्रवेश जाहीर</u>**

प्रथम वर्ष बी.फार्म. आणि फार्म.डी. अभ्यासक्रमाच्या पहिल्या केंद्रीय प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील उद्या बुधवारी जाहीर होणार आहे. पहिल्या कॅप फेरीसाठी विद्यार्थ्यांना गुरुवार ते शनिवार  दरम्यान ऑनलाइन अर्ज निश्चिती आणि महाविद्यालयांचा पर्याय भरण्याची सुविधा उपलब्ध होईल, तर पहिल्या कॅप फेरीची निवड यादी २९ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे.  पहिल्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश निश्चित करण्यासाठी ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली आहे.

**<u>गृह सोसायटी पूर्व तपासणी</u>**

सहकारी गृहरचना संस्थांसाठी नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाच्या वतीने 'मानीव अभिहस्तांतरण प्रकरणे, अभिनिर्णय पूर्व तपासणी' हे विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे. २७ ते ३० सप्टेंबर या कालवधीत हे अभियान राबविले जाणार आहे. राज्य सरकारच्या 'सेवा पंधरवडा' या उपक्रमात नागरिकांना अधिक गतिमान, सकारात्मक आणि लोकाभिमुख सेवा देण्यासाठी हे अभियान आयोजित करण्यात आले आहे.

मुंबा फिल्म फाऊंडेशनतर्फे उद्या पासून 28 सप्टेंबर पर्यंत सहाव्या मुंबा आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलचं आयोजन करण्यात आलं आहे. 'आता थांबायचे नाय' या मराठी चित्रपटाच्या प्रदर्शनाने या महोत्सवाचा प्रारंभ होणार आहे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात होणाऱ्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, चित्रपट निर्माते उमेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असेल. यावर्षीच्या महोत्सवात माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरिशनचाही सहभाग आहे. महोत्सवात 25 चित्रपट 75पेक्षा जास्त लघुपट माहितीपट आणि ॲनिमेशन फिल्म्स् दाखवण्यात येणार आहेत. त्याचबरोबर तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र असतील.

**<u>सत्कार</u>**

99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांचा आज महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे, यशस्वी संस्थेचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष राजेंद्र लाखे यांच्यासह विद्यार्थी आणि वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर विभागानं नागरिकांना मालमत्ता कर वेळेत भरण्याचं आवाहन केलं आहे. सध्याच्या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन भरल्यास ४ टक्के सवलत मिळणार आहे. मात्र, ३० सप्टेंबरनंतर कर भरल्यास प्रत्येक महिन्याला दोन टक्के विलंब दंड लागेल. या वर्षी १ एप्रिल ते २२ सप्टेंबरपर्यंत महापालिकेकडे ५९५ कोटी पेक्षा जास्त मालमत्ता कर जमा झाला आहे.

**<u>क्रीडा</u>**

पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी क्रीडा संकुलात १ ते १० ऑक्टोबर दरम्यान १६ वर्षाखालील मुलांसाठी एसएनबीपी अखिल भारतीय हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत देशभरातील २४ संघ सहभागी होणार आहेत.

हवामान

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून पावसानं काहीशी विश्रांती घेतली आहे. उद्या आकाश ढगाळ राहून हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागान वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत.उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर,संध्याकाळी सहा वाजता,ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**